# पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (सत्रनिहाय)

(पंचविसावी तुकडी)

**एम.ए./एम.एस्सी.**

**(संप्रेषण आणि दूर शिक्षण क्षेत्रातील)**

**M.A./M.Sc. (Communication & Distance Education)**

**शैक्षणिक वर्ष : २०१८–२० तुकडी मध्ये 'प्रथम व द्वितीय वर्षाच्या'**

**प्रवेशासंदर्भात माहितीपुस्तिका (Prospectus)**

*(Semester Pattern)*

## शैक्षणिक सेवा विभाग

(Academic Services Division)

ज्ञानगंगा घरोघरी

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

# शैक्षणिक सेवा विभाग : पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (सत्रनिहाय)

*अनुक्रमणिका*


शैक्षणिक सेवा विभाग : पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (सत्रनिहाय)

१. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय .................... ०४

२. शिक्षणक्रमाविषयी .................... ०४

२.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये

२.२ शिक्षणक्रमाची उपयुक्तता

२.३ शिक्षणक्रमाचा परिचय

२.४ अध्ययन पद्धती

३. प्रवेश प्रक्रिया .................... ०८

३.१ प्रवेश पात्रता (प्रथम वर्ष)

३.२ प्रवेश पात्रता (द्वितीय वर्ष)

३.२ शिक्षणक्रम कालावधी

३.३ शिक्षणक्रम शुल्क

४. मूल्यमापन प्रक्रिया व पद्धती .................... ०८

५. अभ्यासकेंद्रे .................... ११

६. विभागीय केंद्रे .................... १३

७. संपर्कासाठी .................... १३

८. गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांसाठी पारितोषिके .................... १४

# शैक्षणिक सेवा विभाग : पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (सत्रनिहाय)

**शैक्षणिक वेळापत्रक : वर्ष २०१८-२०२० (प्रथम व द्वितीय वर्षासाठी)**

**पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम : एम.ए./एम.एस्सी. (संप्रेषण व दूरशिक्षण)**

**(Post Graduate Programme : M.A. / M.Sc.)**

**(Communication and Distance Education)**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम सत्र** | : | **०१ सप्टेंबर ते डिसेंबर २०१८** |
| **द्वितीय सत्र** | : | **जानेवारी २०१९ ते एप्रिल २०१९** |

## (अ) अंतर्गत मूल्यमापन : प्रथम वर्ष

**प्रथम सत्र :** पदव्युत्तर शिक्षणक्रमाच्या प्रथम सत्रामध्ये 'अनुदेशन प्रणाली अभिकल्प', 'पर्यावरण अभ्यास' तसेच 'शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय संशोधन पद्धती' या अभ्यासक्रमांचे स्वाध्याय लिहून अभ्यासकेंद्रावर केंद्रसंयोजकांच्या सूचनेप्रमाणे परंतु १५ डिसेंबर २०१८ पूर्वी जमा करावयाचे आहेत.

**द्वितीय सत्र :** 'शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन', 'शैक्षणिक नियोजन' तसेच 'मूल्यनिर्धारण व मूल्यमापन' या तीन अनिवार्य विषयांबरोबरच विद्यार्थ्याने निवडलेल्या एका वैकल्पिक विषयाच्या स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे लिहून ती दिनांक १५ एप्रिल २०१९ पूर्वी जमा करावयाची आहेत.

## (ब) अंतर्गत मूल्यमापन (द्वितीय वर्ष तिसरे सत्र)

'शिक्षणातील संज्ञापन प्रकार', 'प्रौढ व निरंतर शिक्षण' तसेच 'अनौपचारिक शिक्षण' या तीन अनिवार्य विषयांबरोबरच विद्यार्थ्याने निवडलेल्या एका वैकल्पिक विषयाच्या स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे लिहून ती अभ्यासकेंद्रावर दिनांक १५ डिसेंबर २०१८ पूर्वी जमा करावयाची आहेत.

**चौथे सत्र**

(१) 'मानवी हक्कांचे संप्रेषण (OPN 236)' या विषयाच्या स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे लिहून विद्यार्थ्यांना ती अभ्यासकेंद्रावर दिनांक १५ एप्रिल २०१९ पूर्वी जमा करावयाची आहेत.

(२) 'परिसंवाद' (OPN 265)' या अभ्यासक्रमासाठीचे सादरीकरण विद्यार्थ्याने अभ्यासकेंद्रावर करावयाचे आहे. अभ्यासकेंद्र संयोजकांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांनी सादरीकरण करावे.

अभ्यासकेंद्रावरील सर्व विद्यार्थ्यांचे सादरीकरण दिनांक १५ एप्रिल २०१९ पूर्वी पूर्ण करून अभ्यासकेंद्र संयोजकांनी त्याचे गुण ऑनलाईन पद्धतीने परीक्षा विभागास कळवावयाचे आहेत.

(३) संशोधन प्रकल्प अहवाल विद्यार्थ्यांनी दिनांक १५ मार्च २०१९ पर्यंत **अभ्यासकेंद्रावर** जमा करावयाचे आहेत.

(४) संशोधन अहवालावर आधारित मौखिक परीक्षा अभ्यासकेंद्र संयोजकांनी दिनांक १५ एप्रिल २०१९ पूर्वी **अभ्यासकेंद्रावरच** आयोजित कराव्यात. विद्यार्थ्यांनी मौखिक परीक्षेचे वेळापत्रक अभ्यासकेंद्र संयोजकांकडून प्राप्त करावे.

अभ्यासकेंद्र संयोजकाने प्रकल्प अहवाल तसेच मौखिक परीक्षेसाठी परीक्षकांची नियुक्ती करावी. त्यानुसार झालेल्या गुणदान याद्या परीक्षा विभागास दिनांक १५ एप्रिल २०१९ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने पाठवाव्यात.

**(क)** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विद्यापीठाने जाहीर केलेल्या ऑनलाईन प्रवेश पद्धतीमधील तपशीलानुसार प्रवेश कालावधी व शैक्षणिक वेळापत्रक असेल. त्यामध्ये दर्शविल्यानुसार शिक्षणक्रमांचे वेळापत्रक असेल. सदर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. सदर माहिती संकेतस्थळावर बघण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची असेल. वर दर्शविलेल्या सत्र कालावधीमध्ये बदल होऊ शकतो. असा बदल झाल्यास त्याची माहिती अभ्यासकेंद्रावरून अथवा विद्यापीठ संकेतस्थळावरून जाणून घेण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची असेल.

# १. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय

शैक्षणिक सेवा विभाग (Academic Services Division) हा विद्यापीठातील एक महत्त्वाचा शैक्षणिक विभाग आहे. उच्च दर्जाच्या संशोधनाधारित शिक्षणक्रमांची आखणी, त्या शिक्षणक्रमांची अंमलबजावणी व त्यासाठी परिसंवाद वा कृतिसत्रांद्वारे विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्कातून संमंत्रण, उच्च दर्जाच्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती ही या विभागाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहित करणे व त्यासाठी दर्जेदार मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हे या विभागाने आपले ध्येय मानले आहे. या विभागामार्फत सध्या संप्रेषण व दूरशिक्षण क्षेत्रातील एम.ए./एम.एस्सी. हे शिक्षणक्रम राबविले जातात.

| *क्र.* | *पदवी* | *शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code)* |
|---|---|---|
| (१) | एम.ए. (विषय संप्रेषण) | M 31 |
| (२) | एम.ए. (शैक्षणिक संप्रेषण) | M 32 |
| (३) | एम.एस्सी. (विषय संप्रेषण) | M 35 |
| (४) | एम.ए. (दूरशिक्षण) | M 33 |

यानुसार एम.ए. हा शिक्षणक्रम 'विषय संप्रेषण', 'शैक्षणिक संप्रेषण' तसेच दूर शिक्षण या क्षेत्रांसाठी; तर एम.एस्सी हा शिक्षणक्रम केवळ, 'विषय संप्रेषण' या क्षेत्रासाठी उपलब्ध आहेत.

पदव्युत्तर स्तरावरील एम.ए./एम.एस्सी. या शिक्षणक्रमाचे तात्त्विक भाग (Theory) आणि संशोधन कार्य (Research Work) असे दोन घटक आहेत. हे शिक्षणक्रम सध्या महाराष्ट्रामध्ये एकूण त्रेसष्ठ अभ्यासकेंद्रांवर राबविले जातात. शैक्षणिक सेवा विभागातर्फे सदर अभ्यासकेंद्रांशी नियमित संपर्क राखला जातो आणि विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक तसेच प्रशासकीय आधार पुरविला जातो.

सर्व शिक्षणक्रमांच्या विविध टप्प्यांवर गुणवत्ता निश्चितीसाठी सतत विशेष प्रयत्न केले जात असतात. अशा तऱ्हेने संशोधन क्षेत्रातील एका नवीन परंतु भविष्यवेधी उपक्रमाचे संयोजन या विभागातर्फे केले जाते.

महाराष्ट्रात मुक्त विद्यापीठाची साधारणतः २०० शिक्षणक्रमांची शिक्षणक्रमनिहाय ३८०० अभ्यासकेंद्रे कार्यरत आहेत. या अभ्यासकेंद्रांचा विस्तारदेखील वेगाने होतो आहे व त्यासाठी प्रशिक्षित संमंत्रकांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाली आहे. शिक्षणक्षेत्रात कार्यरत नसलेल्या अनेकांना शिक्षक म्हणून काम करण्याची आवड असते. अशा लोकांकडे पदव्युत्तर पदवी ही पात्रता देखील असते. मात्र, शिक्षक म्हणून पूर्ण वेळ सेवा देणे त्यांना शक्य होत नाही. असे अनेक लोक मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासकेंद्रांवर संमंत्रक म्हणून काम करू शकतात. अशा संभाव्य संमंत्रकांना शास्त्रोक्त पद्धतीने संमंत्रणाचे प्रशिक्षण देण्याच्या हेतूने शैक्षणिक सेवा विभागाने 'संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम' (Certificate Programme in Counsellor Training) विकसित केला आहे. हा शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्यांना व आवश्यक पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्यांना संमंत्रक होण्याची संधी मिळू शकते.

याबरोबरच शैक्षणिक सेवा विभागातून 'मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम', 'बी.ए. (ग्राहक सेवा)' व 'गांधी विचार दर्शन पदविका' हे शिक्षणक्रमही राबविले जातात.

# २. शिक्षणक्रमाविषयी

## २.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे व वैशिष्ट्ये

### २.१.१ उद्दिष्टे

(१) पदव्युत्तर पदवी शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना संप्रेषण क्षेत्रातील संशोधनावर आधारित पदव्युत्तर पदवी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

(२) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना शैक्षणिक प्रणालीतील शास्त्रीय/मूलभूत तत्त्वांचा सखोल परिचय करून देणे.

(३) प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांना अध्यापनाच्या विविध मार्गांबाबत अवगत करणे.

(४) विद्यार्थ्यांना योग्य व अचूक संशोधन करण्यास प्रवृत्त करणे.

(५) पत्रकारिता तसेच विविध प्रकारच्या संप्रेषण माध्यमातील कर्मचाऱ्यांना संप्रेषण, मानवी हक्क, संशोधन प्रक्रिया व पर्यावरण याविषयी अधिक ज्ञान प्राप्त करण्यास प्रवृत्त करणे.

(६) गृहिणी, सरकारी व निमसरकारी कर्मचारी, औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी यांना व्यक्तिमत्त्व विकासासाठी या शिक्षणक्रमाद्वारे प्रोत्साहन देणे.

### २.१.२ शिक्षणक्रमाची वैशिष्ट्ये

#### (अ) शिक्षणक्रमाची पदवी

हा शिक्षणक्रम दोन वर्षे कालावधीचा आहे. हा शिक्षणक्रम पूर्ण केल्यावर मिळणारी पदवी ही एखाद्या विषयातील नसेल तर विषय संप्रेषण, दूरशिक्षण आणि शैक्षणिक संप्रेषण अशा संप्रेषणाशी निगडित असलेल्या तीन क्षेत्रांपैकी एक असेल.

याचाच अर्थ ही पदवी एम.ए. (मराठी), एम.एस्सी. (प्राणीशास्त्र), किंवा एम.एड. अशी असणार नाही तर एम.ए. (विषय संप्रेषण : मराठी), एम.एस्सी. (विषय संप्रेषण : प्राणीशास्त्र), एम.ए. (शैक्षणिक संप्रेषण) अशी असेल.

निवडलेल्या शिक्षणक्रमानुसार खालीलपैकी एक पदवी तुम्ही मिळवू शकाल :

(१) एम.ए. : विषय संप्रेषण (निवडलेल्या विषयाचे नाव)
उदाहरणार्थ, एम.ए. : विषय संप्रेषण (मराठी)

(२) एम.एस्सी. : विषय संप्रेषण (निवडलेल्या विषयाचे नाव)
उदाहरणार्थ, एम.एस्सी. : विषय संप्रेषण (भौतिकशास्त्र)

(३) एम.ए. : शैक्षणिक संप्रेषण

(४) एम.ए. : दूर शिक्षण

**(ब) शिक्षणक्रमाची निवड**

(i) विज्ञान तसेच तंत्रविज्ञान शाखेतील पदवीधरास एम.एस्सी. (विषय संप्रेषण) या शिक्षणक्रमास प्रवेश मिळेल, तो एम.ए. या शिक्षणक्रमासही प्रवेश घेऊ शकेल.

(ii) कला तसेच वाणिज्य शाखेतील पदवीधर एम.ए. (विषय संप्रेषण शैक्षणिक संप्रेषण किंवा दूर शिक्षण) शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ शकतो.

## २.२ शिक्षणक्रमाची उपयुक्तता

(१) प्राथमिक तसेच माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना विषय–संप्रेषण तसेच शैक्षणिक संप्रेषण क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त.

(२) अनेक आस्थापनांमध्ये पदव्युत्तर पदवी बढतीसाठी उपयुक्त ठरू शकते.

(३) पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्यांना मुक्त विद्यापीठाच्या बी.एड. प्रवेशास पाच गुणांचा भारांक मिळेल.

## २.३ शिक्षणक्रमाचा परिचय

ह्या शिक्षणक्रमातील संप्रेषणाचा विचार तीन प्रकारच्या अभ्यास क्षेत्रांत करता येतो.

(१) विषय संप्रेषण (Subject Communication),

(२) शैक्षणिक संप्रेषण (Educational Communication),

(३) दूर शिक्षण (Distance Education).

ह्या तिन्ही अभ्यासक्षेत्रांचा आपण आता परिचय करून घेऊ. ह्या तीनपैकी एक क्षेत्र आपल्याला निवडायचे आहे. तसेच या क्षेत्रानुसार आपण ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश घेणार आहात त्या शिक्षणक्रमाचे संकेतांक (Programme Code) खाली दिले आहेत.

| *क्र.* | *पदवी* | *शिक्षणक्रम संकेतांक* (Programme Code) |
|---|---|---|
| (१) | एम.ए. (विषय संप्रेषण) | M 31 |
| (२) | एम.ए. (शैक्षणिक संप्रेषण) | M 32 |
| (३) | एम.ए. (दूरशिक्षण) | M 33 |
| (४) | एम.एस्सी. (विषय संप्रेषण) | M 35 |

**टीप :** सदर शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code) आपल्या प्रवेश अर्जावर लिहिण्यासाठी उपयोगी पडतील.

### २.३.१ विषय संप्रेषण (Subject Communication)

आपण ह्या शिक्षणक्रमात जो अभ्यास करणार तो केवळ एखाद्या विद्याशाखेतील एका विषयाचा नव्हे तर तो अभ्यास–विषय दुसऱ्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवायचा कसा, याचा करणार आहोत. म्हणजे आपला हेतू विषय संप्रेषण आणि त्यातील संशोधन हा आहे. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरीचा आशय, तत्त्वज्ञान, काव्यसौंदर्य या गोष्टी कीर्तन, प्रवचन, व्याख्यान, अध्यापन, चर्चा ह्यांद्वारा लोकांपर्यंत पोहोचवणे हे ज्ञानेश्वरी ह्या विषयाचे संप्रेषण झाले. पण या विविध माध्यमांतून ज्ञानेश्वरी स्वीकारकापर्यंत कशी पोहोचते व ती तशी का पोहोचू शकली, याचा शोध घेणे म्हणजे 'ज्ञानेश्वरीच्या – संप्रेषणाचे – संशोधन करणे.' अशा प्रकारचे संशोधन हे विषय संप्रेषण [(मराठी)तील संशोधनें होईल आणि केवळ मराठीतील संशोधनापेक्षा हे वेगळे संशोधन ठरेल.

### २.३.२ शैक्षणिक संप्रेषण (Educational Communication)

एखाद्या विषयाचे संप्रेषण 'अध्ययन अध्यापन' केंद्रस्थानी मानून केलेले असते. त्यात प्रामुख्याने विद्यार्थी – शिक्षक यांचा सहभाग अभिप्रेत असतो. अशा संप्रेषणाचा प्रमुख हेतू शिक्षण देणे हा असतो. या संशोधनात कुठल्याही विषयाचे अध्ययन – अध्यापन करण्याच्या पद्धतीला महत्त्व असते. उदाहरणार्थ, 'विविध शैक्षणिक खेळांद्वारे शैक्षणिक आशयाचे संप्रेषण आणि परिणामकारक अध्यापन पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास', या विषयातील संशोधन हे शैक्षणिक संप्रेषण या क्षेत्रात येईल.

### २.३.३ दूरशिक्षण (Distance Education)

तंत्रविज्ञानाच्या प्रगतीमुळे व काळाची गरज म्हणून 'दूरशिक्षण' महत्त्वाचे ठरत आहे. कोणत्याही विषयाचे अध्ययन – अध्यापन दूरशिक्षण पद्धतीने करता येते. या शिक्षणपद्धतीची काही वैशिष्ट्येही आहेत.

(१) विद्यार्थी आणि शिक्षक एकमेकांपासून दूर असतात.

(२) संपर्कसत्रांद्वारे किंवा स्वाध्यायांमार्फत द्विमार्गी संप्रेषण साधले जाते.

(३) ह्या पद्धतीत शिक्षणासाठी मुद्रित, दृक्–श्राव्य अशा वेगवेगळ्या माध्यमांचा वापर केला जातो.

(४) विद्यार्थ्यांचा कृतिशील सहभाग येथे अपेक्षित असतो. तो प्रकल्प, क्षेत्रीय कार्य अशा विविध रूपांत असू शकतो.

(५) स्वयं–अध्ययनाला महत्त्व आहे.

(६) विद्यार्थी केंद्रस्थानी असतो.

(७) विद्यार्थ्यांना विभागीय केंद्राचे तसेच अभ्यासकेंद्रांचे सहाय्यही या पद्धतीत उपलब्ध होऊ शकते.

अशा या शिक्षण पद्धतीत संप्रेषण कशा पद्धतीत उपलब्ध होते व व्हावे, याचा शोध घेणे म्हणजे दूरशिक्षण संशोधन होय.

वरील तीन क्षेत्रांपैकी कोणते क्षेत्र निवडावयाचे हे तुमचा आतापर्यंतचा अनुभव, आवड, काही नवीन करण्याची इच्छा व क्षमता, साधनांची उपलब्धता, इत्यादी गोष्टींचा विचार करून ठरवा आणि तुम्ही निवडलेले क्षेत्र वरील वैशिष्ट्यांनुसार तपासून पाहा.

## २.३.४ पदवी / क्षेत्रनिहाय शिक्षणक्रम संरचना

एम.ए. विषय संप्रेषण (M31) / एम.ए. शैक्षणिक संप्रेषण (M32) / एम. ए. दूरशिक्षण (M33) आणि एम.एस्सी. विषय संप्रेषण (M35) यातील विषयाचा तपशील (सत्र – ०१, ०२ आणि ०३)

एम. ए. विषय संप्रेषण (M 31) / एम. ए. शैक्षणिक संप्रेषण (M 32) / एम. ए. दूर शिक्षण (M 33) आणि एम. एस्सी. विषय संप्रेषण (M 35) यातील विषयाचा तपशील (सत्र-०१ / ०२ आणि ०३)

| सत्र-०१ | | अनिवार्य विषय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Course Code | Name of Course | Credits | CA (Internal) | UA (External) | Total Marks | Passing Level |
| 1 | EVS 201 | पर्यावरण अभ्यास (एक पुस्तक) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | EDU 503 | अनुदेशन प्रणाली अभिकल्प (एक पुस्तक) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 3 | EDU 018 | शैक्षणिक आणि समाजशास्त्रीय संशोधन पद्धती (चार पुस्तके) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| | | एकूण ०३ अनिवार्य विषय | 18 | | | 300 | |

| सत्र-०२ | | अनिवार्य विषय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Course Code | Name of Course | Credits | CA (Internal) | UA (External) | Total Marks | Passing Level |
| 1 | EDU 513 | शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन (एक पुस्तक) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | EDU 514 | शैक्षणिक नियोजन (दोन पुस्तके) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 3 | EDU 511 | मूल्यनिर्धारण व मूल्यमापन (एक पुस्तक) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| | | एकूण ०३ अनिवार्य विषय | 18 | | | 300 | |
| | | वैकल्पिक विषय (कोणताही एक विषय निवडावा) | | | | | |
| 1 | GEN 121 | Cyber Security | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | GEN 101 | English | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| 3 | GEN 103 | French | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| 4 | GEN 104 | Arabic | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| 5 | GEN 105 | German | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| 6 | GEN 204 | Communication Skills | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| 7 | GEN 122 | Office Tools | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| | | एकूण ०१ वैकल्पिक विषय | 4 | | | 100 | |

| सत्र-०३ | | अनिवार्य विषय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Course Code | Name of Course | Credits | CA (Internal) | UA (External) | Total Marks | Passing Level |
| 1 | EDU 512 | शिक्षणातील संज्ञापन प्रकार (एक पुस्तक) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | EDU 515 | प्रौढ व निरंतर शिक्षण (एक पुस्तक) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 3 | EDU 516 | अनौपचारिक शिक्षण (एक पुस्तक) | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| | | एकूण ०३ अनिवार्य विषय | 18 | | | 300 | |
| | | वैकल्पिक विषय (कोणताही एक विषय निवडावा) | | | | | |
| 1 | GEN 203 | Value Education | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | GEN 401 | Yoga Education | 4 | 20 | 80 | 100 | 40 |
| | | एकूण ०१ वैकल्पिक विषय | 4 | 20 | 80 | 100 | 40 |

एम. ए. विषय संप्रेषण (M 31) / एम. ए. शैक्षणिक संप्रेषण (M 32) / एम. ए. दूर शिक्षण (M 33)
आणि एम. एस्सी. विषय संप्रेषण (M 35) यातील विषयाचा तपशील (सत्र-०४)

एम. ए. विषय संप्रेषण (M 31)

सत्र-०४ अनिवार्य विषय

| Sr. No. | Course Code | Name of Course | Credits | CA (Internal) | UA (External) | Total Marks | Passing Level |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OPN 236 | मानवी हक्कांचे संप्रेषण | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | OPN 265 | परिसंवाद | 6 | 100 | Nil | 100 | 40 |
| 3 | M31 PRJ | संशोधन प्रकल्प / साधन निर्मिती अहवाल | 4 | 50 | Nil | 50 | 20 |
| 4 | M31 VIV | मौखिक परीक्षा | 2 | 50 | Nil | 50 | 20 |
| | | एकूण ०४ अनिवार्य विषय | 18 | | | 300 | |

एम. ए. शैक्षणिक संप्रेषण (M 32)

सत्र-०४ अनिवार्य विषय

| Sr. No. | Course Code | Name of Course | Credits | CA (Internal) | UA (External) | Total Marks | Passing Level |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OPN 236 | मानवी हक्कांचे संप्रेषण | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | OPN 265 | परिसंवाद | 6 | 100 | Nil | 100 | 40 |
| 3 | M32 PRJ | संशोधन प्रकल्प / साधन निर्मिती अहवाल | 4 | 50 | Nil | 50 | 20 |
| 4 | M32 VIV | मौखिक परीक्षा | 2 | 50 | Nil | 50 | 20 |
| | | एकूण ०४ अनिवार्य विषय | 18 | | | 300 | |

एम. ए. दूर शिक्षण (M 33)

सत्र-०४ अनिवार्य विषय

| Sr. No. | Course Code | Name of Course | Credits | CA (Internal) | UA (External) | Total Marks | Passing Level |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OPN 236 | मानवी हक्कांचे संप्रेषण | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | OPN 265 | परिसंवाद | 6 | 100 | Nil | 100 | 40 |
| 3 | M33 PRJ | संशोधन प्रकल्प / साधन निर्मिती अहवाल | 4 | 50 | Nil | 50 | 20 |
| 4 | M33 VIV | मौखिक परीक्षा | 2 | 50 | Nil | 50 | 20 |
| | | एकूण ०४ अनिवार्य विषय | 18 | | | 300 | |

एम. एस्सी. विषय संप्रेषण (M 35)

सत्र-०४ अनिवार्य विषय

| Sr. No. | Course Code | Name of Course | Credits | CA (Internal) | UA (External) | Total Marks | Passing Level |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OPN 236 | मानवी हक्कांचे संप्रेषण | 6 | 20 | 80 | 100 | 40 |
| 2 | OPN 265 | परिसंवाद | 6 | 100 | Nil | 100 | 40 |
| 3 | M35 PRJ | संशोधन प्रकल्प / साधन निर्मिती अहवाल | 4 | 50 | Nil | 50 | 20 |
| 4 | M35 VIV | मौखिक परीक्षा | 2 | 50 | Nil | 50 | 20 |
| | | एकूण ०४ अनिवार्य विषय | 18 | | | 300 | |

## ३. प्रवेश प्रक्रिया

### ३.१ प्रवेश पात्रता (प्रथम वर्ष)

विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठाची किंवा अभिमत विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण.

(१) विज्ञान तसेच तंत्रविज्ञान शाखेतील विद्यार्थी एम.एस्सी. किंवा एम.ए. शिक्षणक्रमांना प्रवेश घेऊ शकेल.

(२) कला तसेच वाणिज्य शाखेतील पदवी घेतलेला विद्यार्थी 'एम.ए. विषय संप्रेषण / शैक्षणिक संप्रेषण / दूरशिक्षण या शिक्षणक्रमांना प्रवेश घेऊ शकेल.

### ३.२ प्रवेश पात्रता (द्वितीय वर्ष)

सदर पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाचे प्रथम वर्ष उत्तीर्ण, अनुत्तीर्ण तसेच अनुपस्थित विद्यार्थी द्वितीय वर्षास प्रवेशासाठी पात्र असतील. द्वितीय वर्षास स्वतंत्रपणे प्रवेश घ्यावा लागेल. (शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनीदेखील पुन्हा अर्ज भरून द्वितीय वर्षाचे शुल्क जमा करणे आवश्यक आहे)

### ३.३ शिक्षणक्रम कालावधी

या शिक्षणक्रमाची विभागणी 'प्रथम वर्ष' आणि 'द्वितीय वर्ष' अशी दोन वर्षातील चार संत्रांत (Semester) केलेली असून विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय वर्षासाठी स्वतंत्रपणे प्रवेश घ्यावयाचा आहे.

**प्रथम वर्ष**

प्रथम सत्र : ०१ सप्टेंबर ते डिसेंबर २०१८

द्वितीय सत्र : जानेवारी २०१९ ते एप्रिल २०१९

**द्वितीय वर्ष**

तिसरे सत्र : ०१ सप्टेंबर २०१८ ते डिसेंबर २०१८

चौथे सत्र : जानेवारी २०१९ ते एप्रिल २०१९

### ३.४ शिक्षणक्रम शुल्क

#### शिक्षणक्रम शुल्क (प्रथम वर्ष)

प्रथम वर्षासाठी एकूण शुल्क रु. ४000/- (चार हजार) आहे. यापैकी विद्यापीठाचा हिस्सा रु. २,000/- असून तो प्रवेश अर्ज भरते वेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच अभ्यासकेंद्र हिस्सा रु. २,000/- असून अभ्यासकेंद्र हिस्स्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

#### शिक्षणक्रम शुल्क (द्वितीय वर्ष)

द्वितीय वर्षासाठी एकूण शुल्क रु. ४000/- (चार हजार मात्र) आहे. यापैकी विद्यापीठाचा हिस्सा रु. २,000/- असून तो प्रवेश अर्ज भरते वेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच अभ्यासकेंद्र हिस्सा रु. २,000/- असून अभ्यासकेंद्र हिस्स्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या प्रथम तसेच द्वितीय वर्षासाठी एकूण शुल्क रु. ८,000/- आहे.

**महत्त्वाचे :** प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरून झाल्यानंतर त्याचा प्रिंटआऊट घ्यावा. सदर प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करावा. अभ्यासकेंद्र हिस्सा (शुल्क) तसेच प्रवेश अर्जाचा प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यास या शिक्षणक्रमाचे उपलब्ध असलेले अध्ययन साहित्य (पुस्तके) प्राप्त होऊ शकेल.

### ३.५ श्रेयांक

प्रथम वर्ष : ३६

द्वितीय वर्ष : ३६

पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (प्रथम व द्वितीय वर्ष मिळून) एकूण ७२ श्रेयांकांचा आहे.

### ३.६ नोंदणी कालावधी

नोंदणी कालावधी : ह्या शिक्षणक्रमाचा विहित कालावधी दोन वर्षे प्रस्तावित आहे. जे विद्यार्थी विहित दोन वर्षाच्या कालावधीमध्ये हा शिक्षणक्रम पूर्ण करू शकणार नाहीत त्यांची नोंदणी ६ वर्षे (प्रवेश घेतलेल्या वर्षापासून) ग्राह्य असेल. या शिक्षणक्रमाची पुनर्नोंदणी सुविधा नाही. त्यामुळे प्रवेश घेतलेल्या वर्षापासून सहाव्या वर्षाच्या शेवटी शिक्षणक्रम पूर्ण न करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होतील.

## ४. मूल्यमापन प्रक्रिया व पद्धती

४.१ चारही सत्रांमधील सर्व तात्त्विक अभ्यासक्रम प्रत्येकी १०0 गुणांचे असतील. तसेच चौथ्या सत्रामधील मानवी हक्कांचे संप्रेषण आणि संशोधन परिसंवाद या अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी १०0 याप्रमाणे, तसेच संशोधन प्रकल्प अहवालासाठी ५0 तर मौखिक परीक्षेचे ५0 गुण अशा एकूण ३00 गुणांसाठी मूल्यमापन केले जाईल. त्यानुसार प्रथम तसेच द्वितीय वर्षांचे सत्रनिहाय गुणविभाजन खालीलप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| प्रथम वर्ष – | सत्र – १ : | ३00 |
| | सत्र – २ : | ३00 |
| द्वितीय वर्ष – | सत्र – ३ : | ३00 |
| | सत्र – ४ : | ३00 |

म्हणजेच, संपूर्ण शिक्षणक्रमासाठी १२00 गुण असतील. त्यापैकी १000 गुणांसाठी तात्त्विक अभ्यासक्रम (Theory Courses) तर २00 गुणांसाठी संशोधन कार्याचा (१00 गुण संशोधन परिसंवाद + ५0 गुण संशोधन अहवाल + ५0 गुण मौखिक परीक्षा) समावेश असेल.

४.२ दुसऱ्या आणि तिसऱ्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी निवडलेल्या वैकल्पिक (Choice Based Credit System अंतर्गत) अभ्यासक्रमांमध्ये प्राप्त केलेले गुण अंतिम निकालामध्ये SGPA–वCGPA–साठी विचारात घेतले जाणार नाहीत.

४.३ सर्व चारही सत्रांमधील अनिवार्य तसेच वैकल्पिक अभ्यासक्रम प्रत्येकी १०० गुणांचे असतील. त्यापैकी २० गुण स्वाध्याय/गृहपाठासाठी (Internal Assessment) तर उर्वरित ८० गुण सत्र अखेरच्या लेखी परीक्षेसाठी (End Examination) असतील. चौथ्या सत्रामधील संशोधन परिसंवाद (OPN 265) या अभ्यासक्रमासाठी लेखी परीक्षा नसेल. त्याऐवजी विद्यार्थ्याने केलेल्या संशोधन कार्यावर आधारित सादरीकरण (presentation) करावे लागेल. त्यासाठी १०० गुण असतील. या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन अभ्यासकेंद्राद्वारे सत्र अखेरीस करण्यात येईल. त्यानुसार प्राप्त गुणांची यादी अभ्यासकेंद्र संयोजक विहित ऑनलाईन पद्धतीने व मुदतीत परीक्षा कक्षाकडे पाठवतील.

४.४ प्रत्येक २० गुणांच्या स्वाध्याय/गृहपाठासाठी प्रत्येकी पाच गुणांच्या चार प्रश्नांची उत्तरे लिहून तो स्वाध्याय विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावरील संयोजकाकडे त्या सत्रातच विहीत मुदतीत जमा करावयाचा आहे. अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (http://ycmou.digitaluniversity.ac) शैक्षणिक सेवा विभागाच्या रकान्याअंतर्गत उपलब्ध असतील. विद्यार्थ्यांनी ते प्रश्न शोधून उत्तरे लिहावयाची आहेत. गृहपाठ/स्वाध्याय प्रश्न छापील स्वरुपात दिले जाणार नाहीत.

४.५ संबंधित अभ्यासक्रमाचे समंत्रक (अध्यापक) स्वाध्याय/गृहपाठ प्रश्नांची उत्तरे तपासतील. विहित मुदतीत जमा झालेल्या विद्यार्थ्यांच्या गृहपाठ/स्वाध्याय प्रश्नांच्या उत्तरांची गुणसूची अभ्यासकेंद्र संयोजक निर्धारित मुदतीत परीक्षा कक्षाकडे (युनिट – ०१) सादर करतील. सदर गुण online पद्धतीनेच परीक्षा कक्षास पाठविणे आवश्यक असेल.

४.६ प्रत्येक सत्रादरम्यान स्वाध्याय/गृहपाठ प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना विहित मुदतीमध्येच जमा करता येतील. तसेच स्वाध्याय/गृहपाठ जमा करण्यासाठी संबंधित सत्रामध्ये एकच संधी असेल. विहित मुदतीमध्ये स्वाध्याय/गृहपाठ प्रश्नांची उत्तरे जमा न करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेमध्ये संबंधित अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मूल्यमापन गुणाच्या रकान्यामध्ये शुन्य गुण दर्शविले जातील.

४.७ दुसऱ्या आणि तिसऱ्या सत्रांमधील वैकल्पिक विषयांसाठी उत्तीर्णता पातळी किमान ४० गुण असेल. मात्र, वैकल्पिक विषयामध्ये विद्यार्थ्यास मिळालेल्या गुणांचा उल्लेख गुणपत्रिकेमध्ये करण्यात येणार नाही. त्याऐवजी 'अभ्यासक्रम पूर्ण / अपूर्ण' असा शेरा असेल.

**(अ) उत्तीर्णता पातळी :**

(१) **अनिवार्य अभ्यासक्रम (सत्र १ ते ४) :** १०० पैकी किमान ४० गुण *(लेखी परीक्षेत ८० पैकी किमान ३२ गुण आवश्यक)*

(२) **वैकल्पिक अभ्यासक्रम (सत्र २ व ३) :** १०० पैकी किमान ४० गुण *(लेखी परीक्षेत ८० पैकी किमान ३२ गुण आवश्यक)*

(३) **संशोधन परिसंवाद :** १०० पैकी किमान ४० गुण

(४) **संशोधन प्रकल्प अहवाल :** ५० पैकी किमान २० गुण

(५) मौखिक परीक्षा : ५० पैकी किमान २० गुण

वरील तपशीलानुसार संपूर्ण शिक्षणक्रम यशस्वीपणे उत्तीर्ण घोषित होण्यासाठी विद्यार्थ्याला एकूण १२०० गुणांपैकी किमान ४८० गुण प्राप्त करणे आवश्यक असेल.

४.८ एखादा विद्यार्थी प्रथम सत्रातील अभ्यासक्रमांपैकी एका अथवा काही अथवा सर्व अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षेसाठी अनुपस्थित असल्यास अथवा अनुत्तीर्ण झाला तर त्याला सदर अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा तिसऱ्या सत्रामध्ये देता येईल. त्यासाठी सदर विद्यार्थ्याने पुनर्परीक्षार्थी अर्ज भरून विहित शुल्कासह परीक्षा कक्षाकडे विहित पद्धतीने जमा करावा लागेल. त्याचप्रमाणे द्वितीय सत्रातील एका अथवा काही अथवा सर्व अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षेसाठी अनुपस्थित तसेच अनुत्तीर्ण अभ्यासक्रमांची परीक्षा चौथ्या सत्रामध्ये देता येईल. त्यासाठी देखील पुनर्परीक्षार्थी अर्जासह विहित शुल्क परीक्षा कक्षाकडे विहित पद्धतीने जमा करावे लागेल. म्हणजेच, विषम क्रमांकाच्या सत्रातील अपूर्ण अभ्यासक्रम (अनुपस्थित अथवा अनुत्तीर्ण) पुढील विषम क्रमांक सत्रामध्येच पूर्ण करता येतील. त्याचप्रमाणे, सम क्रमांकाच्या सत्रातील अपूर्ण अभ्यासक्रम (अनुपस्थित अथवा अनुत्तीर्ण) पुढील सम क्रमांक सत्रामध्येच पूर्ण करता येतील.

४.९ प्रत्येक अभ्यासक्रमाच्या सत्र अखेरच्या लेखी परीक्षेसाठी (End Examination) ८० गुण असतील. त्यासाठी प्रश्नपत्रिकेमध्ये प्रत्येकी ०५ गुणांचे २० प्रश्न असतील. त्यापैकी १६ प्रश्नांची उत्तरे लिहावी लागतील.

४.१० पदव्युत्तर शिक्षणक्रमाचे पहिले शैक्षणिक वर्ष (सत्र – ०१ आणि सत्र – ०२) पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला द्वितीय वर्षासाठी (सत्र – ०३ आणि सत्र – ०४) ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज तसेच विहित शुल्क भरून प्रवेश घ्यावा लागेल. त्यासंदर्भातील सविस्तर सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध असतील. विद्यार्थी पहिल्या वर्षातील प्रथम तसेच द्वितीय सत्रात अनुत्तीर्ण अथवा अनुपस्थित असेल तरी द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेणे आवश्यक असेल.

४.११ चारही सत्रांमधील सर्व अभ्यासक्रमांच्या गृहपाठ/स्वाध्याय मूल्यमापनाचे कार्य अभ्यासकेंद्रावरील संबंधित अभ्यासक्रमाच्या अध्यापकांद्वारे करण्यात येईल. सत्र कालावधीमध्ये विद्यार्थ्यांनी लिहून जमा केलेले गृहपाठ / स्वाध्यायांचे मूल्यमापन करून संबंधित अध्यापक त्या अभ्यासक्रमासाठीची गुणदान सूची अभ्यासकेंद्र संयोजक यांचेकडे जमा करतील. त्यानुसार प्रत्येक

सत्रातील सर्व अभ्यासक्रमाच्या गृहपाठ/स्वाध्यायांच्या प्राप्त गुणांची सूची परीक्षा कक्षातील युनिट - ०१ कडे विहित पद्धतीने अभ्यासकेंद्र संयोजक सादर करतील. सदर तपशील निर्धारित वेळेमध्ये परीक्षा कक्षाकडे जमा करण्याची जबाबदारी अभ्यासकेंद्र संयोजकांची असेल. यासाठी अभ्यासकेंद्र संयोजक यांनी यासंदर्भात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना नियमितपणे अंमलात आणणे आवश्यक आहे.

४.१२ चौथ्या सत्रामधील 'संशोधन परिसंवाद' या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी निवडलेल्या संशोधन विषयाच्या शीर्षक, महत्त्व, उद्दिष्टे, कार्यपद्धती, व्याप्ती, परिकल्पना, साहित्य आढावा, निष्कर्ष या घटकांवर आधारित सादरीकरण करणे आवश्यक असेल. सदर सादरीकरणाचे मूल्यमापन अभ्यासकेंद्राद्वारे करण्यात येईल. सदर परिसंवाद सादरीकरण १०० गुणांसाठी असेल. त्याची किमान उत्तीर्णता पातळी १०० पैकी ४० गुण अशी निर्धारित करण्यात आली आहे. या परिसंवादातील प्राप्त गुणांची यादी अभ्यासकेंद्र संयोजक परीक्षा कक्षाकडे विहित पद्धतीने विहित कालावधीमध्ये सादर करतील. या संदर्भातील सविस्तर सूचना परीक्षा कक्षाकडून अभ्यासकेंद्रास कळविल्या जातील.

४.१३ चौथ्या सत्रामधील 'संशोधन प्रकल्प अहवाल' या अभ्यासक्रमांतर्गत तयार केलेला संशोधन अहवाल विद्यार्थी निर्धारित मुदतीत अभ्यासकेंद्रावर जमा करतील. अशा सादर झालेल्या संशोधन प्रकल्प अहवालांचे मूल्यमापन देखील अभ्यासकेंद्रावरील अध्यापकांनी करावयाचे आहे. त्यासाठी संबंधित अभ्यासकेंद्राचे प्रमुख (प्राचार्य) संशोधन अहवाल मूल्यमापनासाठी अभ्यास-केंद्रावरील अध्यापकांची सूची निश्चित करतील. सदर अध्यापकांनी संशोधन अहवालांचे मूल्यमापन करून ५० पैकी गुणदान करावयाचे आहे.

४.१४ संशोधन अहवालांचे मूल्यमापन झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याची मौखिक परीक्षा अभ्यासकेंद्रावर घेतली जाईल. मौखिक परीक्षेसाठी ५० गुण असतील. त्यानुसार, मौखिक परीक्षेतील प्राप्त गुणांची सूची संबंधित अध्यापक अभ्यासकेंद्र संयोजकांकडे सादर करतील. **मौखिक परीक्षा अभ्यासकेंद्रावरच आयोजित करण्यात येईल.**

४.१५ अशा प्रकारे चौथ्या सत्राचा कालावधी पूर्ण होईपर्यंत संशोधन परिसंवाद, संशोधन अहवाल मूल्यमापन आणि मौखिक परीक्षा यांच्या गुणांची यादी अभ्यासकेंद्र संयोजक परीक्षा कक्षाकडे (युनिट -१) निर्धारित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने पाठवतील. चौथे सत्र पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण शिक्षणक्रमाचा अंतिम निकाल जाहीर होत असल्याने याबाबतची कालमर्यादा अभ्यासकेंद्र संयोजक यांनी कटाक्षाने पाळणे आवश्यक असेल.

**४.१६ शिक्षणक्रमाची श्रेणी रचना**

| *Letter Grade* | *Grade Point* | *Marks %* | *Class* |
|---|---|---|---|
| O | 10 | 95.00 - 100.00 | Outstanding |
| A+ | 9 | 85.00 - 94.99 | Excellent |
| A | 8 | 75.00 - 84.99 | Very Good |
| B+ | 7 | 65.00 - 74.99 | Good |
| B | 6 | 55.00 - 64.99 | Above Average |
| C | 5 | 45.00 - 54.99 | Average |
| P | 4 | 35.00 - 44.99 | Pass |
| F | 0 | 00.00 - 34.99 | Fail |
| AB | 0 | 00.00 | Absent |

**४.१७ वैकल्पिक विषयांच्या अध्ययन साहित्याबाबत :** सत्र ०२ मध्ये एकूण ०७ वैकल्पिक विषय उपलब्ध आहेत, तर सत्र ०३ मध्ये ०२ वैकल्पिक विषय उपलब्ध आहेत. या वैकल्पिक विषयांचे अध्ययन साहित्य मुद्रित माध्यमात नाही. ते विविध वेबसाईटवर उपलब्ध होऊ शकते. तसेच या ०९ वैकल्पिक विषयांचे संमंत्रण अभ्यासकेंद्रावर होणार नाही. विद्यार्थ्यांनी ते ऑनलाईन पद्धतीने स्वतः उपलब्ध करून घ्यावयाचे आहे. वैकल्पिक विषयांची तयारी स्वयं-अध्ययन पद्धतीने करणे अपेक्षित आहे.

# ५. अभ्यासकेंद्रे

| क्र. | अभ्यासकेंद्र | संकेतांक |
|---|---|---|
| (१) | कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर अध्यापक आणि अनुसंधान महाविद्यालय, आपोती खुर्द<br>जि. अकोला–४४४००३ | ११७१ ए |
| (२) | श्री. शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन, शिवाजी नगर, डॉ. पंजाबराव देशमुख चौक, अमरावती | १२७५ ए |
| (३) | कै. छगनलाल मुळजीभाई कढी आर्टस् कॉलेज (अचलपूर कँप), परतवाडा, जि. अमरावती | १२०५ ए |
| (४) | श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे रामकृष्ण बी.एड. कॉलेज, उत्तमनगर, अमरावती | १२१२८ |
| (५) | नारायणराव नागरे कला व वाणिज्य महाविद्यालय, मु.पो. दुसरबीड, ता. सिंदखेडराजा, जि. बुलडाणा–४४३ ३०८ | १३५२ ए |
| (६) | कॉलेज ऑफ मॅनेजमेंट,  दूरदर्शन केंद्राजवळ, वामन नगर, मु.पो. खामगाव, जि. बुलडाणा – ४४४३०३ | १३९२ ए |
| (७) | श्री. विलासराव देशमुख कॉलेज ऑफ एज्युकेशन, मु. पो. निवाणा, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा | १३१०४ |
| (८) | स्व. गजानन माणिकरावजी गावंडे विज्ञान महाविद्यालय, सर्वे नं.१२७, ए.एन.एस. इंन्फोव्हॅली कँपस<br>चांदमारी चौक, शेलोडी रोड, मु.पो. खामगाव, जि. बुलडाणा | १३१०९ |
| (९) | नॅशनल एज्युकेशन सोसायटीचे मातोश्री सायराबाई चंपालालजी चोपडा बी.एड. कॉलेज,<br>स.नं. ६७, प्लॉट नं. ६३, टँक रोड, कॉटन मार्केटच्यामागे, खामगाव – ४४४ ३०३, जि. बुलढाणा | १३१४७ |
| (१०) | जिजाऊ शिक्षण महाविद्यालय, वंजारी फैल, यवतमाळ – ४४५ ००१ | १४०३ ए |
| (११) | कै. विरजी भिमजी घेरवरा महाविद्यालय, मु.पो. दारव्हा, जि. यवतमाळ – ४४५२०२ | १४४८ ए |
| (१२) | गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड, जि. यवतमाळ – ४४५२०६ | १४५१ ए |
| (१३) | वृत्तपत्र विद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद – ४३१ ००४ | २१०९ ए |
| (१४) | बी.जी.पी.एस. महिला अध्यापक महाविद्यालय, पी–७५, एम.आय.डी.सी., चिखलठाणा, औरंगाबाद | २११७२ |
| (१५) | आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, मु.पो. कडा, ता. आष्टी, जि. बीड | २२१७ ए |
| (१६) | ओमशांती अध्यापक महाविद्यालय, मु.पो.ता. अंबड, जि. जालना–४३१ २०४ | २३२० ए |
| (१७) | वसंतराव नाईक शिक्षणप्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, छत्रपती कॉलनी, जुना जालना<br>जालना – ४३१ २०३ | २३२१ ए |
| (१८) | मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, कुंभार पिंपळगाव, ता. घनसावंगी<br>जि. जालना – ४३१२११ | २३५४ ए |
| (१९) | रामकृष्ण परमहंस महाविद्यालय (आर.पी.कॉलेज), उस्मानाबाद – ४१३ ५०१ | २६०२ ए |
| (२०) | होमी भाभा विज्ञान शिक्षण संस्था (TIFR), व्ही.एम. पुरव मार्ग, अणुशक्तीनगर बस डेपोजवळ, मानखुर्द<br>मुंबई – ४०० ०८८ | ३१०७ ए |
| (२१) | मांजरा चॅरिटेबल ट्रस्टचे कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, एस.डी.यु. कॉम्प्लेक्स, सेक्टर–४,<br>कॉर्पोरेशन बँकेजवळ, ऐरोली, नवी मुंबई – ४०० ७०८ | ३१४८० |
| (२२) | डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, कोलाड गोवे, ता. रोहा<br>जि. रायगड – ४०२ ३०४ | ३२७६ ए |
| (२३) | सम्यक प्रबोधन संघ संचलित भिमराव टी.प्रधान महाविद्यालय, शहापूर, जि. ठाणे–४२१ ६०१ | ३५२६१ |
| (२४) | स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय, छत्रपती भवन, आयरे रोड, दत्त नगर, डोंबिवली (पूर्व)<br>जि. ठाणे–४२१ २०१ | ३५२९८ |

| क्र. | अभ्यासकेंद्र | संकेतांक |
|---|---|---|
| (२५) | शासकीय अध्यापक महाविद्यालय, शीट नं.५, खोली नं.१२१/३, सांस्कृतिक भवनासमोर, नरकासूरी वार्ड भंडारा | ४१०२ ए |
| (२६) | जनता कॉलेज ऑफ एज्युकेशन, सिव्हिल लाईन्स, चंद्रपूर-४४२ ४०१ | ४२२० ए |
| (२७) | शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली द्वारा संचलित, ॲड. एन.एस. गंगुवार शिक्षण महाविद्यालय गडचिरोली | ४३०२ ए |
| (२८) | ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडा चौक, हनुमान नगर, नागपूर-४४०००९ | ४४२०३ |
| (२९) | डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, महात्मा फुले कॉलनी, सावंगी (मेघे) रोड, वर्धा - ४४२ ००१ | ४५७७ ए |
| (३०) | विद्या प्रतिष्ठान महाराष्ट्र संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, १०५, केडगाव देवी रस्ता, अहमदनगर-४१४००५ | ५११६ ए |
| (३१) | धुळे एज्यु. सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय (पालेशा), एस.आर.पी. पेट्रोल पंपाजवळ, डॉ. लोहिया मार्ग धुळे-४२४००१ | ५२०१ ए |
| (३२) | नाशिक एज्युकेशन सोसायटीचे पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक - ४२२००१ | ५४२०४ |
| (३३) | नंदूरबार तालुका विधायक समितीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदूरबार - ४२५ ४१२ | ५५०७ ए |
| (३४) | सी.टी.बोरा महाविद्यालय, शिरूर (घोडनदी), जि. पुणे - ४१२ २१० | ६२१४ ए |
| (३५) | बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, फर्ग्युसन रोड, पुणे - ४११ ००४ | ६२२५ ए |
| (३६) | संघवी केशरी कॉलेज, आचार्य आनंदऋषीजी रोड, चिंचवड स्टेशन, पुणे - ४११ ०१९ | ६२१५९ |
| (३७) | डॉ. एम. ए. खान बी.एड. कॉलेज, सुलतानपूर रोड, मु.पो. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे-४१० ५०३ | ६२३२१ |
| (३८) | आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा - ४१५००१ | ६४०१ ए |
| (३९) | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोमवार पेठ, पंतांचा कोट, कराड, जि. सातारा-४१५ ११० | ६४०६ ए |
| (४०) | कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सेठ वालचंद हिराचंद मार्ग, अशोक चौक, सोलापूर - ४१३ ००६ | ६५०७ ए |
| (४१) | के.एन.भिसे आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, परंडा रोड, कुर्डुवाडी, ता. माढा. जि. सोलापूर - ४१३ २०८ | ६५५२ ए |
| (४२) | महावीर महाविद्यालय, ७-ई, भाऊसिंगजी रोड, न्यू पॅलेसजवळ, कोल्हापूर - ४१६ ००३ | ७११२१ |
| (४३) | शांतीनिकेतन, लोकविद्यापीठ परिसर, माधवनगर रोड, सांगली-४१६ ४१६ | ७२०२ ए |
| (४४) | कन्या महाविद्यालय, पो.बॉक्स. क्र.२९, छत्रपती शिवाजीनगर, मिरज, जि. सांगली - ४१६४१० | ७२८० ए |
| (४५) | अध्यापक महाविद्यालय, मु.पो. भरणे, ता. खेड, जि. रत्नागिरी | ७३९८ ए |
| (४६) | श्री. पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग - ४१६ ५१० | ७४५१ ए |
| (४७) | डॉ. जे.बी. नाईक आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, आर.पी.डी. हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मु.पो. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग - ४१६ ५१० | ७४६४ ए |
| (४८) | वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मु.पो. शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर ४१३ ५१४ | ८४५२ ए |
| (४९) | मैत्री इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, विठ्ठल दर्शन, टागोर नगर, राजस्थानी हायस्कूलजवळ, लातूर - ४१३ ५१२ | ८४६७ ए |
| (५०) | संजीवनी महाविद्यालय, चापोली, ता. चाकूर, जि. लातूर - ४१३ ५१३ | ८४९१ ए |

| क्र. | अभ्यासकेंद्र | संकेतांक |
|---|---|---|
| (५१) | MIT जनसंवाद कॉलेज, MIMSR मेडिकल कॉलेज कॅम्पस, विश्वनाथ पूरम, अंबाजोगाई रोड, लातूर | ८४११३ |
| (५२) | पीपल्स कॉलेज, स्नेहनगर, नांदेड– ४३१ ६०२ | ८५१५ए |
| (५३) | दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य महाविद्यालय, मु.पो. ता. भोकर, जि. नांदेड | ८५७६ ए |
| (५४) | कै. सौ. शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी – ४३१ ५१४ | ८७१०३ |
| (५५) | शिवाजी कॉलेज, कोठलज रोड, हिंगोली – ४३१ ५१३ | ८८०४ ए |
| (५६) | शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड, जि. नांदेड | ८५१४० |

## ६. विभागीय केंद्रे

**(१) अमरावती :**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
अमरावती विभागीय केंद्र
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही., अमरावती – ४४४ ६०४
☎ : (०७२१) २५३१४४४, फॅक्स: २५३१४४५

**(२) औरंगाबाद :**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांचे वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी
औरंगाबाद – ४३१ ००२
☎ : (०२४०) २३७१०६६/७७
फॅक्स : २३७१०८८

**(३) मुंबई :**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा,
दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ)
नाना चौक, ग्रँट रोड (प.), मुंबई – ४०० ००७
☎ : (०२२) २३८७४१८६ / २३८१३२५६
फॅक्स : २३८२६१३५

**(४) नागपूर :**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
नागपूर विभागीय केंद्र
सुभेदार हॉल, विद्यापीठ क्रीडा परिसर
लॉ कॉलेज कॅंपस, रविनगर चौक
नागपूर – ४४० ००१
☎ : (०७१२) २५५३७२४, फॅक्स : २५५३७२५

(५) **नाशिक** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
नाशिक विभागीय केंद्र
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी,
नाशिक –४२२ ००२ ☎ : (०२५३) २३१७०६३
फॅक्स : २५७६७५६

(६) **पुणे** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा क्र.५ (मुलांची),
६५४, सदाशिव पेठ हौदासमोर कुमठेकर मार्ग, पुणे –४११ ०३०,
☎ : (०२०) २४४९११०७ फॅक्स : २४४५७९१४

(७) **कोल्हापूर** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर, पोस्ट ऑफिसजवळ
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४
☎ : (०२३१) २६०७०२२ फॅक्स : २६०७०२३

(८) **नांदेड** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे
नांदेड विभागीय केंद्र, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ
क्रीडा इमारत, नांदेड – ४२१ ६०६
☎ : (०२४६२) २३६७१८

## ७. संपर्कासाठी

- **शैक्षणिक बाबींविषयी**

(१) **प्रा. डॉ. प्रमोद बियाणी**
संचालक, शैक्षणिक सेवा विभाग
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३००४७, २२३००१० फॅक्स : ०९१ – ०२५३ – २२३००१०

(२) प्रा. डॉ. हेमंत राजगुरू
सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३००१०

- **निकालाविषयक चौकशी**

**उपकुलसचिव**
**परीक्षा विभाग, युनिट क्र. एक,** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक – ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३०७१६

- **शैक्षणिक सेवा विभागाचा ई–मेल**

ycmou.asd@gmail.com

## ८. गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांसाठी पारितोषिके

पदव्युत्तर शिक्षणक्रम प्रावीण्यासह प्रथम वर्ग किंवा प्रथम वर्गासह प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील पारितोषिके देण्यात येतील.

| क्र. | दाता–प्रायोजक | पारितोषिक | रक्कम रु. | कोणासाठी (पात्रता) |
|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र शासन | दादासाहेब गायकवाड | १००० | एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी. (प्रथम क्रमांक) |
| २. | श्री. साळुंके सुरेश शिवराम | सौ. गुणवंता शिवराम साळुंके | १००१ | एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी. (प्रथम क्रमांक) |
| ३. | महाराष्ट्र शासन | दादासाहेब गायकवाड | ७५० | एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी. (द्वितीय क्रमांक) |
| ४. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | यशवंतराव चव्हाण सुवर्ण पदक | – | एम.कॉम. (विषय संप्रेषण) सर्व प्रथम |
| ५. | श्री. भारत व सौ. वैद्य | कै. गंगूबाई वैद्य पारितोषिक | १००१ | एम.ए. (मराठी) सर्व प्रथम |

**■ शैक्षणिक सेवा विभागामार्फत राबविले जाणारे अन्य शिक्षणक्रम**

(१) संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (Certificate Programme in Counsellor Training)

(२) मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम (Certificate Programme in Human Rights)

(३) गांधी विचारदर्शन पदविका शिक्षणक्रम (Diploma in Gandhi Vichar Darshan)

(४) बी.ए. (ग्राहक सेवा) (B.A. Counsumer Services)

**विशेष सूचना :** (१) विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास त्यास प्रवेशशुल्क परत मिळणार नाही.
(२) विद्यार्थी अपात्र असतानाही त्याने प्रवेश घेतल्यास प्रवेशशुल्क परत मिळणार नाही.

# मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासनमान्यता

**(१) अन्य विद्यापीठांच्या पदवीशी समकक्षता**

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्र क्र. समक (उ. शि.)/१०९४/३२८६१/मवि-१, दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या पत्रान्वये 'केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेली पदवी/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था प्रस्तावित केलेल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) मधील कलम क्र. ३ अन्वये मानीव विद्यापीठे घोषित केली आहेत अशांच्या बाबतीत पदवी किंवा पदविका मान्यता देण्याबाबतचे औपचारिक आदेश विद्यापीठाने काढण्याची आवश्यकता नाही'.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने अधिनियमाद्वारे (कायदा क्र. २०/१९८९) स्थापन केलेले विद्यापीठ असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचीही मान्यता आहे. **त्यामुळे या विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.**

**(२) विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F/S-15/89 (CPP-I) दि. ८ डिसेंबर १९९२ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील कलम १२-बी अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मान्यता दिली आहे.

**(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता**

उपसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्र क्र. १४७७ (१७/१९९४/कक्ष) **दि. १७ फेब्रुवारी १९९४ च्या पत्रातील मान्यतेसंबंधीचा मजकूर - 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे संविधिमान्य (Statutory) असल्यामुळे आपल्या विद्यापीठाच्या पदवीधर विद्यार्थ्यांकडून आलेले अर्ज देखील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीधर उमेदवारांकडून आलेल्या अर्जांप्रमाणेच आयोगाकडून विचारात घेतले जातील'**

# मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली विद्यापीठे

राज्य सेवेतील पदासांठी पदवी/पदविकास मान्यता

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय :** क्रमांक आरजीडी-१३९४/प्र.क्र. २१/९४/१३,मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ८ मार्च १९९५

**वाचा :** (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरजीडी-१०६१/१८९६७/ ११४ - जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९

**शासन निर्णय :** महाराष्ट्र लोक सेवा आयोगाशी विचार विनिमय करून उपरोक्त दिनांक २१ ऑगस्ट १९६९ च्या आदेशाद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, केंद्र अथवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापित झालेली विद्यापीठे, संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्था, किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गत भाग ३ अन्वये जाहीर झालेली मानवी विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका तसेच भारतीय वैद्यकीय मंडळ अधिनियम, १९५६ च्या परिशिष्टांमध्ये अंतर्भूत केलेल्या वैद्यकीय व संलग्न विषयामधील पदव्या यांना शासकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदे वगळता, **राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी आपोआप मान्यता प्राप्त झाली असल्याचे समजण्यात यावे.**

(२) सदर आदेशासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या वैधानिक विद्यापीठे व संस्थांची यादी जोडण्यात आली होती. आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे व संस्था यांची अद्ययावत यादी आता या आदेशासोबत जोडण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी - १०६१/१८९६७/ ९१४/जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९ मध्ये नमूद केलेल्या आणि वर परिच्छद १ मध्ये उद्धृत केलेल्या हेतूसाठी सदर सर्व विद्यापीठे/संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना आपोआप मान्यता देण्यात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

दा. र. राणे

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) राज्यपालांचे सचिव
(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव
(३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
(४) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
(५) महालेखापाल, महाराष्ट्र -२, मुंबई
(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(७) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
(९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
(१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
(११) सर्व मंत्रालयीन शिक्षण
(१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
(१३) अवर सचिव, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली
(१४) निवड नस्ती

**वाचा : महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णय क्रमांक आर.जी.डी. १३९४/प्र.क्र.२१/९४/१३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ८ मार्च १९९५ च्या सोबत जोडलेल्या यादीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अनुक्रमांक १४६ वर नोंद करण्यात आलेली आहे.**

## निर्मिती

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२



© २०१८, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



- **प्रथम प्रकाशन** : मे २०१८
- **अक्षरजुळणी** : ॲकोसिस, नाशिक – १०
- **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB-18-19-09 (PG_ASD)**